खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

मराठी विभाग : फिरते ग्रंथालय उपक्रम

पुण्य नगरी

फिरत्या ग्रंथालयाचे राजगुरू महाविद्यालयात स्वागत

राजगुरूनगर : प्रतिनिधी

पुणे पुस्तक महोत्सव, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या फिरत्या ग्रंथालयाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. गोपाळ अलापुरे, डॉ. पायल ओसवाल, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आणि डॉ. विठ्ठल दौंडकर, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे सुरेश कुमार, धर्मपाल सिंग, मनोज कुमार, सतीश कुमार, हरिभाऊ आव्हाड

यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन ज्ञानाची व्याप्ती वाढण्यास अशा उपक्रमांचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास बुट्टे पाटील यांनी व्यक्त केला.

दरम्यान, डिसेंबरमधील पुस्तक महोत्सव व जानेवारी महिन्यात पुणे येथे होणाऱ्या १००व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रणही संस्थेला व महाविद्यालयाला देण्यात आले. विद्यार्थ्यांनी पुस्तकांनी सजलेल्या फिरत्या ग्रंथालयाची पाहणी करून विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती घेतली. वाचनसंस्कृतीला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. आदित्य बोरसे, दिव्या पिंगळे, ज्ञानदा कड, ओम जाधव, अभिषेक कोरडे या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

Pimpri Chinchwad Edition
Aug 22, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात फिरत्या ग्रंथालयाचे स्वागत करताना मान्यवर.

राजगुरू महाविद्यालयात फिरते ग्रंथालय

पुणे पुस्तक महोत्सव, साहित्य संमेलनानिमित्त आयोजन

राजगुरुनगर, ता. २९ : पुणे पुस्तक महोत्सव आणि आगामी १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित फिरत्या ग्रंथालयाचे हुतात्मा राजगुरू व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात उत्साहात स्वागत करण्यात आले.

राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या या उपक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापकांनी प्रतिसाद दिला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यावेळी म्हणाले, "महाराष्ट्राची समृद्ध साहित्यिक परंपरा जपण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी. फिरते ग्रंथालय हा ज्ञानाची व्याप्ती वाढवणारा प्रेरणादायी उपक्रम आहे."

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप यांच्यासह राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बसमधील विविध विषयांवरील पुस्तकांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी जानेवारीत पुण्यात होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रणही देण्यात आले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. आदित्य बोरसे, दिव्या पिंगळे व सहकाऱ्यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख